## सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११
## जाहिर नोटस

सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ च्या सर्वेक्षणाच्या प्रारूप याद्या दिनांक २० मार्च, २०१५ रोजी संपूर्ण जिल्हयात ग्रामीण व शहरी/नागरी भागामध्ये शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे जिल्हयातील सर्व ग्रामपंचायती व नगरपालिका क्षेत्रामध्ये संबधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालय येथे प्रसिध्द करण्यात येतील. तसेच सदर प्रारूप यादीची एक प्रत Soft Copy (PDF) मध्ये तळमजला, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, गोंदिया येथे उपलब्ध राहील व एक प्रत केद्र शासनाच्या SECC NIC च्या http://www.secc.gov.in/state वेबसाईडवर आणि जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे http://gondia.gov.in/ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ अंतर्गत प्रारूप यादी मधील कुटुंबांना आपले दावे व आक्षेप नोंदवावयाचे असतील तर यादी प्रसिध्दी झाल्यापासून ग्रामीण व भागासाठी ३० दिवस व शहरी भागासाठी २१ दिवसांत संबधित ग्रामपंचायत कार्यालय व नगर परिषद यांचेकडे शासनाने दिलेल्या प्रपत्र अ,ब,क,ड,इ फार्म मध्ये एकावेळी फक्त एकास नोंदविता येईल.

करिता सदरील नोटिस देण्यात येत आहे.

नमुना अ : प्रसिध्द केलेल्या प्रारूप यादीमधील माहितीवर आक्षेप दाखल करण्याबाबत.
नमुना ब : प्रसिध्द केलेल्या प्रारूप यादीतील माहितीच्या तपशिलातील सुधारणा/फेरबदल करण्याबाबत.
नमुना क : प्रगणना करतांना वगळलेल्या/राहण्याच्या/नेहमीच्या ठिकाणापासून दूर गेलेल्या कुटुंबाचा समावेश करण्यासाठी भरावयाचा नमुना.

(वरिल नमुन्यातील दाखल करण्यात येणारे अर्ज हे एकाच व्यक्तीकडून त्याची स्वाक्षरी असलेला एकच अर्ज स्वीकारल्या जाईल. एकापेक्षा जास्त अर्ज किंवा अनेकांच्या वतीने असणारा अर्ज स्विकारल्या जाणार नाही.)

नमुना ड : वरिल नमुन्याचा उपयोग करून दावे व आक्षेप दाखल केलेल्या व्यक्तींना नोटिस देण्याचा नमुना असून ज्या व्यक्तींनी आक्षेप घेतलेला आहे त्यांना अपिलीय अधिकाऱ्यांकडून सुनावणीचा दिनांक, वेळ, व ठिकाण दिले जातील.
नमुना इ : प्रसिध्द केलेल्या प्रारूपयादीमध्ये सुधारणा, दुरूस्ती इ. बाबत ग्रामसभेने घ्यावयाच्या ठरावाच्या तपशिलाची नोंद.

दावे व आक्षेप विहीत नमुन्यात प्रारूप यादी प्रसिध्दीच्या ठिकाणी असणारे पंचायतस्तरीय अधिकारी (PLO) किंवा वार्डस्तरीय अधिकारी (WLO) यांचेकडे विहीत मुदतीत दाखल करता येतील व त्यावेळी सुनावणीची तारीख व वेळ देण्यांत येईल. प्रथम अपिलीय अधिकारी ग्रामीण भागासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती तथा तालुका स्थरावरील निर्देशत अधिकारी व नगर पालिका क्षेत्रासाठी मुख्याधिकारी नगरपालिका हे राहतील.

ग्रामीण व नगरपालिका क्षेत्रासाठी उपविभागीय अधिकारी हे द्वितीय स्तरीय अपिलिय अधिकारी म्हणून कार्य करतील. अपिलकर्त्यांनी सुनावणीच्या वेळी पुराव्यासह हजर राहून आपली बाजू मांडणे अनिवार्य आहे. मुदतीनंतरचे दावे व हरकती स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. दावे व आक्षेपासंदर्भात विहीत नमुन्यातील अर्ज हे ग्रामीण भागासाठी संबधित ग्रामपंचायत, पंचायत समिती येथे आणि शहरी भागासाठी नगर पालिका येथे उपलब्ध करून देण्यात येतील.

प्रसिध्द करावयाच्या यादीमध्ये ज्या नागरीकास स्वत:च्या कुटुंबाची माहिती प्रसिध्द करावयाची नसेल तर अशा नागरिकांनी तसे अर्ज संबधित पंचायत समिती/नगर परिषद या कार्यालयास सादर करावेत. तथापी जे नागरिक त्यांची माहिती प्रसिध्द करण्यात येणाऱ्या प्रारूप यादीमध्ये प्रसिध्द करू नये, असे अर्ज दाखल करतील अशा नागरिकांसाठी सुचित करण्यात येत की, त्यांना शासनाच्या कुंठल्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही.

सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ साठीची प्रारूप यादी प्रसिध्द झाल्यापासूनची कार्यवाही संपूर्ण जिल्हयात होणार असल्याने सर्व शहरी/ग्रामीण जनतेने याची नोंद घ्यावी अशी प्रसिध्दी जिल्हाधिकारी गोंदिया यांचे वतीने करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प संचालक तथा सदस्य सचिव<br>सा.आ.जा.सें २०११ जि.ग्रा.वि.य,गोंदिया | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जि.प तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती<br>जि.ग्रा.वि.य,गोंदिया | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष<br>सा.आ.जा.सें २०११, गोंदिया |

# सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११
## जिल्हा : गोंदिया

## दावे व आक्षेप प्रक्रियेबाबत कार्यक्रमाची रूपरेषा

(पत्र क./जिग्राविय/गों/सप्रअ(संनि.)/साआजास २०११/२७८७ /२०१५ दिनांक १६/०३/२०१५)

| अ.क्र | करावयाची कार्यवाही/बाबी | ग्रामीण (दिवस व कालावधी) | शहरी (दिवस व कालावधी) | प्रस्तावीत (कालावधी) |
|---|---|---|---|---|
| १ | प्रारूप यादी प्रसिध्दी करणे | २०/०३/२०१५ | २०/०३/२०१५ | १ दिवस |
| २ | ग्राम पंचायत स्तरावर ग्राम सभा घेणे/नगर परषिद स्तरावर सभा घेणे | १० दिवस<br>२०/०३/२०१५ ते २९/०३/२०१५ | १० दिवस<br>२०/०३/२०१५ ते २९/०३/२०१५ | १० दिवस |
| ३ | दावे व आक्षेप स्विकारणे | ३० दिवस<br>२०/०३/२०१५ते १८/०४/२०१५ | २१ दिवस<br>२०/०३/२०१५ ते ०९/०४/२०१५ | ३० दिवस |
| ४ | दावे व आक्षेप निकाला काढण्याची अखेरची तारीख | ५२ दिवस<br>२०/०३/२०१५ ते १०/०५/२०१५ | ५२ दिवस<br>२०/०३/२०१५ ते १०/०५/२०१५ | ५२ दिवस |
| ५ | द्वितीय अपिलीय अधिकाऱ्या द्वारे अपील अर्ज स्विकारणे | ०८ दिवस<br>१०/०५/२०१५ ते १८/०५/२०१५ | ०८ दिवस<br>१०/०५/२०१५ ते १८/०५/२०१५ | ०८ दिवस |
| ६ | अपिल निकालात काढण्याची अखेरची तारीख | ०७/०६/२०१५ | ०७/०६/२०१५ | ८० दिवस |
| ७ | अंतिम यादीची प्रसिध्दी | ०९/०६/२०१५ | ०९/०६/२०१५ | ८२ दिवस |

स्वा
प्रकल्प संचालक तथा सदस्य सचिव
सा.आ.जा.सें २०११ जि.ग्रा.वि.य,गोंदिया

स्वा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती
जि.ग्रा.वि.य,गोंदिय

स्वा
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
सा.आ.जा.सें २०११, गोंदिया